स्व्यातोस्लाव साखार्नोव

गलबतांच्या नवलकथा

स्व्यातोस्लाव साखार्नोव

गलबतांच्या नवलकथा

अनुवादः अनिल हवालदार

चित्रेः एरीक बेन्यामिन्सन
बरीस कीश्तीमोव

रादुगा प्रकाशन
मॉस्को



“ गलबताचा आरंभ कसा झाला ?”

“ लाकडाच्या ओंडक्यापासून . माणसाने झाड तोडले . त्याच्या फांद्या छाटल्या . खोडामध्ये पोकळी खोदली . त्या पोकळीत बसून पाण्यावर प्रवास केला . वल्ही मारून दमला तेव्हा त्याला शिडाची कल्पना सुचली .”

“ पण होडीतून किती लांब जाशील !”

“ असे म्हणतात – धाडसी माणसाला समुद्र अडवत नाही !”

कोच

थंडा समुद्र . ढगांचे पांढरे ससे . आकाशात बर्फाचे प्रतिबिंब पडलेय असे भासते .

दंतुर किनाऱ्यापाशी छोटेसे गलबत होते – कोच . पोमोर म्हणून ओळखली जाणारी माणसे त्यात बसली . गलबताच्या नाकाशी – शिकारी , सुकाणूशी – सुकाणूवाला . शिकारी तीक्ष्ण नजरेचा , सुकाणूवाला त्याच्यापेक्षा जास्त तीक्ष्ण नजरेचा .

“ अरे मार्केल , त्या किनाऱ्यावर काय आहे ? एखादं जनावर तर नव्हे ?”

अगदी बरोबर – जनावरच होते . खडकांवर लालसर रंगाची प्रचंड जनावरे पहुडली होती . त्यांना माना नव्हत्याच . मिशावाल्या ओठांखालून सुळे बाहेर आलेले . समुद्रघोडे ! शिकाऱ्यांनी शिकारीची तयारी केली . कुणी सोटा परजत होता , कुणी दोर वळत होता , कुणी कुऱ्हाड शोधत होता . कोच गुपचूपपणे किनाऱ्याकडे निघाले .

अचानक समुद्राला भुऱ्या ढगाने वेढले . पांढऱ्या माशा भिरभिरू लागल्या . हिमवर्षाव सुरू झाला ! एका तासात उन्हाळ्याचे हिवाळ्यात रूपांतर झाले . ढग उडून गेला , पण तेवढ्या वेळात समुद्रघोडे गायब ! पसार झाले ! पुन्हा छोटे गलबत समुद्रावर प्रवास करू लागले .



पसरट गलबताचा वल्हेवाला

जोवान्नीला व्हेनिसच्या बाजारात पकडले. शिपायांबरोबर त्याने मारामारी केली होती. अटक केलेल्या सर्वांना न्यायाधीशाने पसरट गलबतांवर धाडले. जोवान्नीला इतर दोन कैद्यांबरोबर एका बाकाला साखळदंडाने जखडून ठेवण्यात आले होते. तिघांना मिळून एक वल्हे, एक साखळदंड, एक मडके. झोपायला एक गवताची पेंडी...

एक आठवड्यानंतर पसरट गलबतांचा काफला शत्रूच्या किल्ल्यापाशी आला. लढाऊ गलबतांनी अर्धवर्तुळाकार रचना केली व इशाऱ्यासरशी त्यांनी हल्ला चढवला. किल्ल्याच्या तटांवरून गलबतांवर बाणांचा पाऊस कोसळू लागला. "लौकर! लौकर!" जोवान्नीवर आणि त्याच्या दोन साथीदारांवर चाबूक उडवीत शिपाई ओरडला. तिघेजण अंगातील सर्व बळ एकवटून वल्हे चालवू लागले. अचानक मोठा हादरा बसला, आरोळ्या उमटल्या. गलबत गाळात अडकले. गलबतावरून माणसे, ढाली आणि मोडकी वल्ही कलंडली... तेवढ्यात जोवान्नीला दिसले की, बाकडे तुटले होते आणि साखळदंडाचे टोक ढिले पडले होते. तिघा वल्हेवाल्यांनी साखळदंड डोक्यांवर धरून गलबतावरून खाली उड्या मारल्या.

रात्री एका लोहाराच्या ओसाड भट्टीत त्यांनी साखळदंड तोडला आणि एकमेकांचे हात दाबून निरोप घेतला. अशा रीतीने जोवान्नी इटालीला परतला.



व्हेनीसची वल्हेवाली पसरट नौका. वारा अनुकूल असे तेव्हाच फक्त शिडांचा वापर करीत.



अस्सीरीयन वल्ह्यांचे गलबत.

इजिप्तचे शीडासकटचे वल्ह्यांचे गलबत.



ग्रीक लढाऊ गलबत.

महान शोधांचा काळ

एकेकाळी गलबतांचा समुद्रसंचार वर्ष-वर्ष चालायचा. खलाशांच्या घरची माणसे खूप काळ वाट पहात बसायची.

अखेरीस गलबत परतायचे. प्रवासात अनेक खलाशी मरण पावलेले असत, तुफानांमध्ये गलबताची नासधूस झालेली असे, शिडांची फाटून लक्तरे लोंबत असत... सांगायला भरपूर हकीकती असत!

"आम्ही पार अमेरिकेच्या किनाऱ्यांपर्यंत गेलो होतो. तुमचा विश्वास बसणार नाही... तिथल्या माणसांचा रंग तांबडा आहे. त्यांच्यापाशी वाळूपेक्षा जास्त सोनं आहे!"



स्पॅनिश शीड-नौका – कारावेल्ला.

GALLEON

"आमचं गलबत थेट हिंदुस्थानपर्यंत गेलं. तिथं माणसं हत्तीवरून फिरतात! रस्त्यावर साप संगीताच्या तालावर नाचतात..."

"आम्ही ऑस्ट्रेलियाहून परतलो. तिथं पोहचायला पुरं एक वर्ष लागलं. तिथल्या मैदानांमध्ये खूप अजब जनावरं आहेत. मिस्टर, कल्पना करा, एक जनावर तर वासराएवढं मोठं आणि उड्या मारत जातं सशाप्रमाणं! त्याला म्हणतात... कां-गा-रू!"

* * *

"सुंदर प्राचीन गलबते!"

फ्रीगेटच्या मागील भागात अस्सल राजवाडा: मनोरे, सज्जे, तांब्याचे दीप. गलबताला न सजवून कसे चालेल? गलबत म्हणजे खलाशाचे घर. एकदा प्रवासाला निघाला म्हणजे खूप काळ परतायचा नाही.



पहिल्या प्योत्रची नौका.



'आर्योल' गलबत. इ. स. १६६८ साली बांधले.

अशा गलबतामधून रशियन खलाशी २५० वर्षांपूर्वी प्रवास करीत होते

रशियन आरमाराचा आरंभ कसा झाला

पहिला प्योत्र* हा फार विचित्र झार होता. जहाजबांधणीची विद्या जाणून घेण्यासाठी तो हॉलंडला गेला आणि गोदीत सुतार म्हणून नोकरी करू लागला.

एकदा झारला भेटायला रशियाहून उमराव गेले. गलबताच्या शेपटाकडून लाकडाच्या भुश्शाने माखलेला एक सुतार त्यांना सामोरा गेला. उमरावांनी पटकन त्या सुतारासमोर गुडघे टेकले. भोवतालचे डच लोक खो खो हसू लागले... नंतर गलबत समुद्रावर घातले. खुद्द झारने वरामीखाली पाचर मारली.

रशियाच्या भावी आरमारी अधिकाऱ्यांना प्योत्रने सर्व युरोपभर शिकायला धाडले. त्याने कोतलीन बेटावर आरमारी किल्ला बांधला आणि क्रोन्श्ताद्त बंदर बांधले. बाल्तिकच्या सागरावर थंडगार वाऱ्यामुळे लाटा उसळत होत्या. बेटावरून पहिली रशियन गलबते एका पाठोपाठ सागरसंचाराला निघाली.

---

* पहिला प्योत्र (१६७२-१७२५) – रशियन झार.

'पोल्तावा'. रशियन बाल्तिक आरमारातील पहिले गलबत.

१७१२

"सर्वांत छान शिडाचे गलबत. त्यावर स्वच्छ असते: डेकवर पांढरा सदरा घालून खुशाल झोपावे, एकही डाग पडणार नाही. आणि आवाज न करता पाणी कापत जाते – फक्त डोलकाठ्यांची किंचित करकर. वारा अनुकूल लाभला म्हणजे कुठल्याही दूर-देशाला जाता येते. मात्र ..."

"मात्र काय?"

"शिडांची नांवे लक्षात ठेवायला फार अवघड आहेत!"



(A) फोर-स्टेसेल
(B) फोर-टॉपमास्ट स्टेसेल
(C) जिब
(D) फ्लाईंग जिब
(E) फोरसेल
(F) फोर-टॉपसेल
(G) फोर-रॉयल
(H) फोर-स्कायसेल
(I) मेन टॉपमास्ट स्टेसेल
(J) मेन टॉपगॅलन्ट स्टेसेल
(K) मेन रॉयल स्टेसेल
(L) मेनसेल
(M) मेन टॉपसेल
(N) मेन रॉयल
(O) मेन स्कायसेल
(P) स्पॅन्कर
(R) मिस्सेन टॉपसेल
(S) मिस्सेन रॉयल
(T) मिस्सेन स्कायसेल





शीडाच्या गलबताचा छेद. डेकच्या खालील माल ठेवण्याची जागा, तोफांचे मोर्चे आणि कप्तानाचा मागील भागातील फलाट.

शतके उलटली आणि शीडांची जागा वाफेच्या यंत्राने घेतली.



'क्लेरमोन्त' – पहिली आगबोट.



पहिली रशियन आगबोट 'येलीझावेता'.



'आर्कीमेद' आगबोटीत प्रथमच चाकाऐवजी पंखा वापरण्यात आला.

अपयशी 'ग्रेट ईस्टर्न'

ह्या मोठ्या आणि अवजड गलबताला "शतकाचे आश्चर्य" म्हणत. पण हे महाकाय गलबत अपयशी ठरले. पहिल्याच महिन्यात सागरावरील तुफानात त्याचे सुकाणू आणि चाक मोडले. त्यांची दुरुस्ती केली, तर पुढच्या वेळी कड्यावर आदळले. प्रवासी ह्या गलबतावरून प्रवास करायला घाबरू लागले.

ह्या महाप्रचंड गलबताला मिळेल ते काम पत्करणे भाग पडले. युद्धकाळात त्याने सैनिकांची वाहतूक केली, महासागराच्या तळाशी तारयंत्राच्या तारा घालण्याची कामगिरी केली, तरंगती सर्कस म्हणूनही काही काळ त्याचा वापर झाला...

जेव्हा 'ग्रेट ईस्टर्न' मोडीत निघाले, तेव्हा शेकडो कामगार तब्बल दोन वर्षेपर्यंत हा धातूचा डोंगर उपसत होते.

'ग्रेट ईस्टर्न' – २११ मीटर लांबी, २५ मीटर रुंदी. त्याच्यावर २० जीवरक्षक बोटी आणि २ छोट्या आगबोटी होत्या.



“असं म्हणतात, आता लौकरच शीडाविना गलबतं असतील!”

“काहीतरीच! नुसत्या वाफेवर गलबतांना चालवायचा तर त्यांचा इरादा नाही?”

अटलांटिक महासागराला प्रथमच ओलांडून जाणारी चाकाची आगबोट.



युद्धनौका 'वार्याग'

रशियाचे जपानविरुद्ध युद्ध सुरू झाले तेव्हा रशियन युद्धनौका 'वार्याग' कोरीयातील चेमूल्पो बंदरात उभी होती बंदरावर जपानी स्क्वाड्रन आले.

"शरण या!" जपानी ॲडमिरलने मागणी केली.

'वार्याग' च्या कमांडरने लढण्याचा निर्णय घेतला. युद्धनौका समुद्रात निघाली.

"शरण या!" जपानी ॲडमिरलने परत एकदा सांगितले. उत्तराऐवजी 'वार्याग' ने तोफ डागली. जपानी विनाशिकेवर



धुराचे लोट उठले. आणखी एक तोफ उडाली! शत्रूची विनाशिका समुद्रतळाला गेली.

पण आरमार तुल्यबळ नव्हते. जपानी तोफगोळ्यांनी चहू-बाजूंनी 'वार्याग' वर मारा केला.

घायाळ युद्धनौका मागे फिरली. ती शत्रूला शरण गेली नाही. तिच्या डोलकाठीवर निशाण फडकत राहिले.



'मॉनितोर' – फिरत्या मनोऱ्याची पहिली संपूर्ण पोलादी युद्धनौका.



रशियन युद्धनौका 'महान प्योत्र.'



'मेरीमाक' – ह्या नौकेला "चिलखती कासव" म्हणत.

गोल गलबत कसे बांधले

युद्ध चालू होते आणि शत्रूवर विजय कसा मिळवावा याबाबत ॲडमिरल विचार करीत होते.

सर्व दिशांना एकाच वेळी तोफा डागू शकेल अशी गोल युद्धनौका त्यांनी बांधली व समुद्रात सोडली.

"धूम् धडाड!" गलबत तोफ डागायचे आणि भांड्याप्रमाणे गोल फिरायचे.

"ह्या गलबतावरून अचूक मारा करणे शक्य नाही," ॲडमिरल खेदाने म्हणाले.

ते विसरले होते की, गलबत नुसते तोफा उडवत नाही, तर त्याने योग्य दिशा धरणेही आवश्यक असते.



गोल गलबत 'नोवगोरद' – ॲडमिरल पोपोव यांच्या आराखड्यानुसार बांधले.

माकड हरवले !

एका माणसाचे आगबोटीवर माकड हरवले.

"कुठं बरं माझं माकड गेलं असेल?" तो प्रवासी आश्चर्य करीत होता.

त्याने केबिन धुंडाळली – नाही! सबंध बोटीवर शोध घ्यायला तो निघाला. कप्तानाच्या डेकवर पाहिले – तेथे सुकाणूवाला सुकाणू धरून उभा होतां, नाखवा नकाशावर खुणा करीत होता. बंबाच्या भागात डोकावून पाहिले – तेथील माणसे चक्क्यांवरून नजर न ढळवता कामात गढली होती. भटारखान्यात पाहिले – दहा आचारी एक हजार प्रवाशांचे जेवण बनवीत होते. माकडाचा कुठेच पत्ता नव्हता!



ЧЕРНОМОРСКОЕ МОРСКОЕ ПАРОХОДСТВО
BLACK SEA SHIPPING COMPANY

Билет Ticket № 000000 Класс Class Первый „А"

Инициалы и фамилия Initials & surname Сахарнов С.В

Возраст (для детей) Age of children

Тариф Rates 153

От — From Александрия

До — To Одесса

Каюта № Cabin No. 102 Место № Berth No. 1

Судно — Ship т/х „Аджария"

Дата отхода Sailing date 22 июня 1975 г.

Печать и подпись агента Stamp & signature of agent

(место и дата выдачи) — place & date of issue) 17.4.75

Скидки — Rebates

За проезд — Fare 153

Сборы Taxes: посадка embarkation 2-00; высадка disembarkation 2-00

Всего получено Total recived 157

Наименование и сумма полученной валюты Kind & sum of currency paid 157 рублей

महासागरगामी आगबोटीच्या उतारूचे तिकीट.

प्रवाशाने सलूनमध्ये पाहिले, पोहण्याच्या तलावाठिकाणी शोधले, फिरण्याचा आख्खा डेक धुंडाळला. पण नाही! माकड कुठे लपले असावे? ह्या सगळ्या अप्रिय धावाधावीपायी त्या माणसाचे डोके दुखू लागले. तो स्वतःच्या केबिनमध्ये परतला आणि ॲस्पिरीनच्या गोळीसाठी त्याने सूटकेस उघडली, तर त्याच्या स्वच्छ सदऱ्यावर माकड शांतपणे झोपले होते!

"इथं आहेस होय तू!" निःश्वास टाकीत प्रवासी म्हणाला. "आणि मी तुझ्यापायी सबंध आगबोट पालथी घातली. अर्धा दिवस तंगडतोड केली... प्रचंड! तरंगणारं अख्खं शहरच!"





युद्धनौका 'मारात'.



क्षेपणास्त्रवाहू युद्धनौका, अग्निबाणांनी सज्ज.



अणुशक्तीवर चालणारी पाणबुडी – सोविएत आरमाराचे मुख्य लढाऊ गलबत.

युद्धनौका 'मारात'

दुसऱ्या महायुद्धात सोविएत युद्धनौका 'मारात' वर फॅसिस्ट विमानांनी बॉंबफेक केली. बोटीत पाणी घुसले आणि बोटीचे नाक पाण्यात बुडाले. ही घटना लेनिनग्रादमध्ये घडली.

त्यावेळी शहरावर सतत विमाने घोंघावत होती. विमान-हल्ल्याच्या इशाऱ्याचे भोंगे वाजत होते. क्षितिजावर आगीचे लोळ उमटत होते. शहराला वेढा पडला होता. शत्रूच्या तोफा लेनिन-ग्रादवर चौफेर मारा करीत होत्या. त्यांच्याशी सामना करायला शस्त्रे अपुरी पडत होती.

अशा परिस्थितीत युद्धनौकेवर कामगार आले. त्यांनी बोटीचा पुढचा भाग वर खेचून दुरुस्त केला, सर्व भोके बुजवली आणि तोफांच्या यंत्रांची दुरुस्ती केली. जुनी युद्धनौका परत सज्ज झाली. कमांडरांचे हुकूम घुमू लागले, खलाशांनी तोफांचे मोर्चे लावले

युद्धनौकेवरून तोफा धडाडू लागल्या. भल्यामोठ्या पेटी-एवढ्या आकाराचा पहिला तोफगोळा शत्रूवर जाऊन आदळला. एखाद्या फॅसिस्ट तोफेतून आता मारा झाला की, ताबडतोब 'मारात' मधून तिला उलट उत्तर मिळू लागले. ती घायाळ नौका परत लढू लागली.

* * *

"अग्निबाण फेकणारे गलबत सर्वांत सामर्थ्यवान! जणू पोलादी किल्ला! शत्रूला ते धडकी भरविते!"

"खरेच, पण आता शत्रूच्या दृष्टीने सर्वांत भयंकर म्हणजे पाणबुडी! पाणबुडी आरमार सर्वांत भयानक! तेसुद्धा अग्निबा-णांनी सज्ज असते आणि प्रत्यक्षात दिसत नाही"


601
562

हत्तींची वाहतूक कशी केली

एका प्राणी-संग्रहालयाच्या संचालकाला एकदा महासागरापार हत्तींना पाठवायचे होते. त्याने हत्तींना पिंजऱ्यांमध्ये बंद केले आणि बंदरावर आणले. हत्ती गाजरे चघळत होते, तोवर संचालक बोटींच्या कप्तानांची हत्तींना घेऊन जाण्याबद्दल मनधरणी करीत होता.

"शक्य नाही!" लाकडे वाहून नेणाऱ्या बोटीचा कप्तान म्हणाला. "मी ओंडके आणि फळ्या वाहून नेतोय. तुमच्या हत्तींना त्यांच्यात कुठं ठेवू?"

"अहो बोलताय काय!" रेफ्रिजरेटरांमधून माल वाहून नेणाऱ्या बोटीचा कप्तान हात झटकत म्हणाला. "आमच्या रेफ्रिजरेटरांमध्ये तुमचे हत्ती गोठून जातील आणि शेवटी त्यांचे उंदीर बनतील!"

"नाही बुवा!" तेलवाहू बोटीचा कप्तान म्हणाला. "टाक्यांमध्ये काठोकाठ तेल भरलंय!"

पण कोरड्या मालाची वाहतूक करणाऱ्या बोटीचा कप्तान म्हणाला:

"हत्ती? शंभरसुद्धा नेईन! तुमचे पिंजरे ट्रॅक्टरांच्या दरम्यान ठेवू. सुखरूप पोहोचते करू."

आणि हत्तींनी महासागरापार प्रवास केला.



कोरड्या मालवाहू मोटर जहाजाचा आडवा छेद.येथे होल्ड, डेक, मस्तूल आणि क्रेनदाखविल्या आहेत.

‘ क्रासिन ’

इटलीमधील काही लोक वायुयानामधून उत्तर ध्रुवाच्या मोहीमेवर निघाले होते. अफाट कडक थंडी होती. वायुयानावर बर्फाचा थर बसला व ते खाली कोसळले. इटालियन माणसे बर्फात अडकून पडली.

त्यांना मदत करण्यासाठी सोविएत हिमभंजन नौका ‘क्रासिन’ धावली.

काही इटालियन माणसे आजारी पडली होती, तर काही जखमी झाली होती. त्यांच्यापाशी पुरेसा शिधा नव्हता. त्यांच्या तंबूखालचा बर्फ तडकू लागला होता.

दरम्यान हिमभंजन नौका त्या माणसांच्या दिशेने जास्तीत जास्त वेगाने जात होती. तिच्या वाटेत अडथळा आणणाऱ्या हिमखंडांचा फोडून भुगा करीत पुढे जात होती. जर हिमखंड चटकन फुटला नाही, तर ‘क्रासिन’ थोडी मागे सरायची आणि पुन्हा जोराने हिमखंडावर आघात करून त्याचा चुरा करायची.

अखेरीस इटालियनांनी क्षितिजावर धुराची रेषा पाहिली. मग डोलकाठीवरील लाल निशाण दिसले. ती ‘क्रासिन’ येत



हिमभंजक आगबोट – 'लीत्के'

होती. आनंदापायी रडणाऱ्या माणसांना बोटीवर उचलून घेण्यात आले. शेवटी त्यांचा तंबू बर्फावरून उचलून घेण्यात आला. त्या तंबूचाही रंग लालभडक होता. खूप दूर अंतरावरून तो दिसू शकत होता.

* * *

"आता जगात सर्वांत मोठी हिमभंजन नौका कोणती?"
"सोविएत संघाची 'लेओनिद ब्रेझ्नेव.'
"सर्वांत मोठी अणुशक्तीवर चालणारी नौका?"
"तीच."

अणुशक्तीवरची 'लेओनिद ब्रेझ्नेव' – सोविएत हिमभंजक नौकांची ध्वजनौका.

"समुद्रावर आजकाल ही विचित्र दिसणारी गलबते कोणत्या प्रकारची? ती रूढ गलबतांप्रमाणे मुळीच दिसत नाहीत. ते पहा एक गलबत चाललेय – त्याच्यावर प्रचंड तबकडया आणि अँटेन्ना आहेत."

"हे गलबत अंतराळवीरांना मदत करते. त्यांच्याबरोबर दळणवळणाचा संपर्क ठेवते."

"आणखी ते पहा एक गलबत. त्याच्या डेकवर यारी आहे आणि गाभ्यात पाणबुडी. हे पाणबुड्यांना मदत करते का?"

"होय. सागरतळांचे संशोधन करण्याचे काम ते करते. त्याच्यावरील पाणबुडी महासागराच्या अगदी तळापर्यंत जाऊ शकते."

"कमाल आहे! एकाहून एक सरस शोध लागताहेत!"



'पेर्सेय' – पहिले सोविएत संशोधक गलबत.



© मराठी अनुवाद, रादुगा प्रकाशन, १९८५
© Издательство "Детская литература", 1976 г.

सोविएत संघात मुद्रित

С. Сахарнов
ПЛЫВУТ ПО МОРЯМ КОРАБЛИ
на языке маратхи

Svyatoslav Sakharnov
SHIPS GO SAILING ON THE SEAS
in Marathi

ISBN 5-05-000237-0